# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 29.11.2024** **वार – शुक्रवार**

---

**राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी**

लष्करी सेवेत दाखल होताना पारंपरिक युध्य कौशल्यांबरोबर नव्यानं अंतर्भूत झालेल्या आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता या गोष्टीत अवगत असणं गरजेचं असल्याचं प्रतिपादन लखनौ विद्यापीठाचे कुलगुरु आलोक कुमार राय यांनी आज पुण्यात केलं. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 147 व्या तुकडीचा दीक्षान्त समारंभ आज पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राय उपस्थित होते. यंदा 359 स्नातकाना पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये विज्ञान शाखेचे 83, संगणक विज्ञान 86, कला शाखेचे 58 तर बिटेक शाखेच्या 132 छात्रांचा समावेश आहे. तर 19 परदेशी छात्र आहेत. उद्या सकाळी 147 व्या तुकडीचा दीक्षांत संचलन सोहळा होणार असून, हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंग उपस्थित राहणार आहेत.

**युवा महोत्सव**

केंद्र शासनाच्यावतीनं 12 ते 16 जानेवारी 2025 या कालावधीत दिल्ली इथं आयोजित राष्ट्रीय युवा महोत्सवात जिल्ह्यातील अधिकाधिक खेळाडूंना सहभागी होता यावे, यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे, नेहरु युवा केंद्र संघटन, पुणे आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरावर युवा महोत्सवाचं आयोजन 6 आणि 7 जानेवारी ला आझम कॅम्पस इथं करण्यात येणार आहे.

**गदिमा पुरस्कार**

गदिमा प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे यांना यंदाचा गदिमा पुरस्कार, तर दिवंगत अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या पत्नी प्रिया लक्ष्मीकांत बेर्डे यांना गदिमांच्या पत्नी विद्याताई माडगूळकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा गृहिणी सखी सचिव पुरस्कार देण्यात येणार आहे. प्रसिद्ध कथा, पटकथा, संवाद लेखक आणि गीतकार क्षितीज पटवर्धन यांना यंदाचा चैत्रबन पुरस्कार, तर प्रसिद्ध गायिका मनीषा निश्चल यांना विद्या प्रज्ञा पुरस्कार देण्यात येणार असल्याची माहिती गदिमा प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त आनंद माडगूळकर यांनी आज आयोजित पत्रकार परिषदेत दिली. आधुनिक महाराष्ट्राचे वाल्मिकी ग. दि. माडगूळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त 14 डिसेंबर 2024 ला संध्याकाळी 5 वाजता टिळक स्मारक मंदिर इथं होणाऱ्या गदिमा स्मृती समारोहात या पुरस्कारांचं वितरण होणार आहे.

**साखर कामगार**

साखर कामगारांच थकीत वेतन मिळावं, साखर उद्योग तसंच जोडधंद्यातील कामगारांचं वेतन आणि सेवा शर्ती ठरवण्याबाबत राज्य सरकारनं त्वरित त्रिपक्ष समिति गठित करावी, या प्रमुख मागण्यांसाठी साखर कामगारांनी 16 डिसेंबरपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. साखर कामगार प्रतिनिधी मंडळाच्या पुण्यात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आमच्या प्रतिनिधींनी कळवली आहे. शेती महामंडळातील कामगारांच्या

प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करावी, अशा आणखी मागण्या मंडळाचे अध्यक्ष काळे आणि सरचिटणीस शंकरराव भोसले यांनी शासनाकडे केल्या आहेत.

**रब्बी**

पुणे जिल्ह्यात रब्बी हंगामातील पेरण्यांचा वेग वाढला असून सध्या 53 टक्के क्षेत्रावरील पिकांच्या पेरण्या पूर्ण झालेल्या आहेत. या क्षेत्रात थोडी आणखी वाढ अपेक्षित असून, गहू आणि हरभऱ्याच्या पेरण्यांनी सध्या वेग घेण्यास सुरुवात केल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली. यावर्षी पाण्याची उपलब्धता अधिक असल्यानं हरभरा आणि गव्हाच्या पेरणीचा आकडा निश्चित वाढणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**बेपत्ता मुलं**

राज्याच्या वेगवेगळ्या शहरातून बेपत्ता झालेली मुल, तसंच महिलांच्या शोधासाठी पोलिसांकडून 'ऑपरेशम मुस्कान 13' ही विशेष मोहीम 1 ते 30 डिसेंबर या कालावधीत राबवली जाणार आहे. बेपत्ता झालेल्या व्यक्तींचा शोध घेण्यासाठी 24 तास आणि 365 दिवस प्राधान्य देण्यात आलं असल्याचं पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितल.

**पालिका**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे चालू आर्थिक वर्षात विविध कामांच्या निविदा प्रक्रिया वेळेत झालेल्या नाहीत. त्यामुळे पुणे महापालिकेच्या खर्चापेक्षा उत्पन्न अधिक झाले आहे. त्यामुळे दोनशे कोटी रुपयांच्या ठेवी बॅंकेत ठेवण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला आहे.

**पालिका**

पुणे महापालिकेनं मिळकत कराची थकबाकी वसूल करण्यासाठी भर दिला आहे. त्यासाठी पाच पथकं तयार केली असून, त्यांच्याबरोबर बॅंड पथकंदेखील असणार आहेत. पुणे महापालिकेच्या मिळकत कर विभागाचे प्रमुख माधव जगताप यांनी ही माहिती दिली.

**टेनिस**

महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेने पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या सहकार्याने आयोजित केलेली 53वी आंतर जिल्हा आणि 86 वी राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा दिनांक 2 ते 6 डिसेंबर दरम्यान पुण्यात होणार आहे. या स्पर्धेत 25 जिल्ह्यांमधील एक हजाराहून अधिक खेळाडू सहभागी झाले आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आजही सकाळी चांगलीच थंडी जाणवली तर कमाल तापमान 27 आणि किमान तापमान 9 पूर्णांक 5 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही हवामान असंच राहणार असल्याचा इशारा वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृतान्त. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**